सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा :- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,**
**२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43**
**३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897**
**४) मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांचे दि.13/03/2020 रोजीचे निर्देश**
**५) मा.प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दि.14/03/2020**
**६) या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष/कोरोना विषाणु/108/2020, दि.14/03/2020**
**७) या कार्यालयाकडील सुधारित आदेश क्र. जि.आ.व्य/कोरोना विषाणु/121/2020, दि.15/03/2020**
**८) मा.प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.करोना/2020/प्र.क्र..58/आरोग्य 5 दि. दि.16/03/2020**

************************************************************************************

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,**
**क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणु/127/2020.**
**पुणे, दिनांक :- 16/03/2020.**

विषय :- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९)चा प्रादूर्भाव रोखणेसाठी
**पुणे जिल्हयातील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत**

## आदेश

ज्याअर्थ, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. व कोरोना विषाणू पासून होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये **आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था हया साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करणेत आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत यादवारे सुचित करणेत आले आहे.**

**त्याअर्थी,** कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, मी **नवल किशोर राम,** अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी **पुणे,** जिल्ह्यात **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५तसेच** महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन वाचा क्र.६ व ७ नुसार पारित केलेला आदेश निरंतर ठेवुन या आदेशान्वये **पुणे जिल्हयातील** सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये **आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था तसेच** ग्रामीण क्षेत्रातील सुध्दा सर्व जिल्हा परिषद, सरकारी व खाजगी शाळा, महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांचे आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था **हया साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करणेत आलेली अधिसुचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाराच्या मान्यातेने दि. ३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवणेबाबत या दवारे सुचित करणेत येत आहे.**

तथापि या कालावधीत इ. १० वी व इ. १२ वी सह इतर सर्व वर्गांच्या परीक्षा नियोजनाप्रमाणे सुरु राहतील. त्याचप्रमाणे आजारी विदयार्थी इतर विदयार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सुचना संबंधित संस्था प्रमुखास देण्यात येत आहेत.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

1. **मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे**
2. **आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
3. **पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड .**
4. **पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण**
5. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,**
6. **प्राचार्य / मुख्याध्यापक – सर्व शाळा व महाविदयालय--------------**